I°

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पालघर  **P.S.(ठाणे):** पालघर  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0126  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/05/2022 13:52 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 28/03/2022
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2022
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/05/2022  **Time (वेळ):** 13:42 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 021  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/05/2022 13:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी ,समिती,नवली,पालघर पुर्व

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** जय मनोहर रानडे मो.नं- 8767670800

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बी/101, मनीनगर,हौ सोसा, लि काळेमार्ग,पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बी/101, मनीनगर,हौ सोसा, लि काळेमार्ग,पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक सचिन अरुण हिरे | | | 1. कार्यालयीन सहाय्यक,जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी,समिती,पालघर,, पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 11/05/2022.मी जय मनोहर रानडे, वय 37 वर्षे, धंदा- व्यवसाय, (महा. ई-सेवा केंद्र, वेवूर, पालघर) रा. बी/101, मनीनगर, हौ. सोसा., लि. काळेमार्ग, पालघर प. मो. 8767670800 समक्ष फिर्याद लिहून देतो की, मी सुमारे 6 वर्षापासून मौजे वेवूर, पालघर पुर्व येथे महा ई-सेवा केंद्र चालवितो. त्याद्वारे मी आधार कार्ड, पन कार्ड, सर्व प्रकारचे शासकिय व शैक्षणीक दाखले काढणे, आयुष्यमान योजनेची कामे व ईतर शासकीय योजनेची कामे करतो. त्यामुळे पालघर येथील शासकीय कार्यालयातील कर्मचा-यांशी माझी ओळख आहे. माझे मित्र यश नरेश बोंद्रे, मुळगाव मु.गौरापूर, ता. वाडा, जि.पालघर, सध्या रा. कळवा, ठाणे यांनी मला दिनांक 21/03/2022 रोजी भेटून सांगीतले की, त्यांनी दिनांक 21/01/2022 रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर यांचे कार्यालयात जात प्रमाणपत्र पडताळणी करीता ऑनलाईन फर्म भरलेला असून अदयाप पावेतो त्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही असे सांगून त्यांनी ऑनलाईन भरलेली पावती मला दाखविली. माझे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर कार्यालयात कामानिमीत्त माझे येणे-जाणे होत असते तसेच सदर कार्यालयातील श्री.सचिन हिरे हे माझे ओळखीचे असल्याने मी त्यांना यश बोंद्रे यांची पावती सचिन हिरे यांच्या व्हटस् अॅपच्या 7385057406 नंबरवर पाठविली. त्यावेळी त्यांनी मला पाहणी करून सांगतो असे सांगीतले. त्यानंतर त्यांनी माझा व्हटस् अॅप नंबर 8767670800 वर व्हटस् अॅप व्हईस कल तसेच फोन करूनही सांगीतले की, यश बोंद्रे यांच्या फाईलमध्ये त्रुटी आहेत त्यांच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी करावी लागेल परंतू सदरचे काम तु माझेकडे घेवून आल्यामुळे मी आमचे कार्यालयाचे नाईक साहेब यांना सांगून तुझे काम करून घेतो पण त्यासाठी 30,000/- रू दयावे लागतील असे सांगीतले. सदरची हकीगत मी माझा मित्र यश बोंद्रे यांना सांगीतली असता, त्यांनी मला सांगीतले की, त्यांना सदरच्या कामासाठी लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. त्यानंतर मी सचिन हिरे यांना प्रत्यक्ष भेटून तसे सांगीतले परंतू त्यानंतरही सचिन हिरे हे मला वारंवार फोन करून व प्रत्यक्ष भेटून सदरच्या प्रकरणामध्ये मध्यस्थी करून यश बोंद्रे यांचेकडून लाचेची रक्कम घेवून देण्यासाठी माझेकडे तगादा लावत होते. परंतू मला लोकसेवक सचिन हिरे यांना लाचेची रक्कम दयावयाची ईच्छा नसल्याने मी श्री. स्वपन बिश्वास, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर यांचेकडे दिनांक 28/03/2022 रोजी लेखी तक्रार दिलेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर चे पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी तक्रारीची पडताळणी करणेकामी दोन पंच साक्षीदार बोलावून त्यांचेशी माझी ओळख करून दिली व मी दिलेल्या तक्रारीची हकीगत सांगून त्यांना मी लिहून दिलेली तक्रार त्यांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार वाचल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केलेल्या आहेत. त्यानंतर दिनांक 28/03/2022 रोजी पंच नं. 01 यांचेसह माझे अंगावर व्हईस रेकर्डर लावून पंच नं. 01 यांचे समक्ष सचिन हिरे यांचेकडे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, त्यामध्ये लोकसेवक सचिन हिरे यांनी यश बोंद्रे यांचे कामासाठी 30,000/- रू लागतील असे बोलून त्यांचे साहेब पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत असे सांगून मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेत तडजोडीअंती 25,000/- रू स्विकारण्याचे मान्य केले. सदरच्या पडताळणी दरम्यान लोकसेवक सचिन हिरे



Scanned with CamScanner

यांनी साहेब पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत असे बोलणे केले असल्याने त्याबाबत पडताळणी करणेकामी मी पंच नं. 01 यांचेसह सचिन हिरे यांची भेट घेवून त्यांना त्यांच्या साहेबांना भेटविण्याची विनंती केली असता, त्यांनी सांगीतले की, डी.जी. साहेबांची व्हीडीओ कन्फरन्स असल्याने भेट होणार नाही असे सांगून साहेब बोलणार नाहीत, विश्वास नसेल तर राहू दे असे सांगीतल्याने मी त्यांना सध्या फक्त दहा हजार रूपये जमलेत असे बोललो, तेंव्हा त्यांनी आता दहा हजार दे व उर्वरीत रक्कम उदया दे असे सांगीतले परंतू लोकसेवक सचिन हिरे यांच्या साहेबांशी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करता येणे शक्य नसल्याने मी तेथून निघून पडताळणी पथकाजवळ आलो. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर दिनांक 29/03/2022 रोजी लाचेच्या सापळा आजमाविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यादरम्यान सचिन हिरे यांच्या साहेबांशी बोलणी करून देण्याबाबत ठरविण्यात येवून माझेकडे उपलब्ध असलेल्या दहा हजार रूपये रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लोकसेवक सचिन हिरे यांना फोन करून भेटण्याबाबत विचारणा केली असता, सचिन हिरे यांनी माझे ई-सेवा केंद्र येथे भेटण्याचे ठरले. त्याप्रमाणे सदर ठिकाणी सापळा पथक सापळा लावून थांबून राहीले, त्यावेळी लोकसेवक सचिन हिरे यांनी माझे फोनवर फोन करून नाय रे, सोड ना, नाय घ्यायचे असे सांगीतले. व त्यानंतर थोडयाच वेळात ते माझे ई-सेवा केंद्रासमोरून मोटरसायकल वरून निघून गेले. त्यावेळी माझे ई-सेवा केंद्रामध्ये गर्दी असल्याने त्यांना संशय आला असण्याची शक्यता असल्याने पुन्हा मी पंच नं. 01 यांचेसह सचिन हिरे यांचे कार्यालयात जावून सचिन हिरे यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक सचिन हिरे यांनी यश बोंद्रे यांचे सर्टीफिकेट ई-मेल वर पाठविल्याचे सांगून यापुर्वी माझे ई-सेवा केंद्राजवळ सापळा आजमाविला त्या ठिकाणी एसीबी चे साहेब उभे असल्याचे सांगीतले. व त्यानंतर ते त्यांच्या कार्यालयीन कामात व्यस्त झाल्याने मी व पंच नं. 01 असे परत निघून आलो. त्यामुळे लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यानंतर दिनांक 30/03/2022 रोजी मी माझे ई-सेवा केंद्र येथे असताना लोकसेवक सचिन हिरे हे तेथे आले व मला म्हणाले की, तुझे बोंद्रे चे काम करून दिले त्याचे पैसे दे त्यावेळी मी त्यांना बोललो की, बोंद्रे काकांनी माझेकडे पैसे दिले होते पण तु नको म्हणून सांगीतले त्यामुळे ते पैसे मी परत दिले त्यावर सचिन हिरे यांनी मला बघ कमीत कमी 5000/- रू तरी दे. असे सांगीतले. तेंव्हा मी त्यांना ठिक आहे मला थोडा वेळ दे असे म्हणून सांगून रात्री फोन करतो असे सांगीतले. त्यानंतर मी अन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयात येवून पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी भेट घेवून सदरची हकीगत सांगीतली असता, त्यांनी सापळा आजमाविण्याचा निर्णय घेवून सचिन हिरे यांनी सांगीतल्याप्रमाणे पाच हजार रूपये लाचेच्या रक्कमेवर सापळा पुर्व कार्यवाही करून लोकसेवक सचिन हिरे हे कोठे भेटतात याकरीता फोन केला असता, त्यांनी लाचेची रक्कम माझे ई-सेवा केंद्राच्या बाजुला असलेल्या मेडीकल दुकानातील इंदर नावाच्या ईसमाकडे देण्यास सांगीतली त्यावेळी मी त्यांना मी कोणाकडे ठेवणार नाही असे सांगीतल्याने त्यांनी जावूदे उदया घेतो असे सांगून उदया फोन करतो म्हणून फोन ठेवला. त्यामुळे सापळा आजमाविता आला नाही. त्यानंतर दिनांक 31/03/2022 रोजी सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करून लोकसेवक सचिन हिरे यांना फोन करून भेटण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मी थोडा कामात आहे रे, करतो तुला संध्याकाळी तु करुन ठेव ना असे सांगीतले. त्यानंतर दुपारच्या सुमारास सचिन हिरे यांनी माझे व्हटस् अँप नंबरवर गुगल पे कर असा संदेश पाठविल्याने त्यांना पुन्हा फोन करून सचिन काय रे काय नाटकी लावलीत च्यायला मध्येच गुगल पे, मधेच कष, काय आहे ते करुन टाक नाय तर राहु दे. असे बोललो असता त्यांनी मार्च एंडच काम चालू होतं, भेटतो ना मी तुला असे सांगीतले. त्यानंतर सायंकाळी सचिन हिरे यांनी माझे फोनवर फोन करून सांगीतले की, ते माझे ई-सेवा केंद्रावर गेले होते परंतू मी तेथे नव्हतो असे सांगून त्यांना हस्पीटल ला जायचं आहे, मिसेस प्रेगनन्ट आहे. असे सांगीतले. त्यावेळीही सचिन हिरे यांनी लाचेची रक्कम इंदर कडे देण्यास सांगीतली. त्यावर मी त्यांना मी नेहमी सिगारेट प्यायला जातो तिकडे भेटण्यास सांगीतले. त्यानंतर पुन्हा सचिन हिरे यांनी माझे व्हटस् अँप नंबरवर गुगल पे कर असा संदेश पाठविल्याने त्यांना पुन्हा फोन करून मी सिगारेट पितो ना तिकडेच आहे तु येवून पटकण घेवून जा, नाहीतर नंतर घे असे सांगीतले. त्यावर सचिन हिरे यांनी ठिक आहे चल, उदया करून दे असे सांगीतल्याने लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यानंतर दिनांक 01/04/2022 रोजी सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करुन मी लाचेच्या रक्कमेसह पंच नं. 01 यांचेसोबत गेलो व लोकसेवक सचिन हिरे यांचेजवळ पाच घेवून आलोय असे सांगीतले. त्याचवेळी सचिन हिरे यांचे मोबाईलवर फोन आला व ते दोन मिनट... हलो हा साहेब दोन मिनट... दोन मिनट .... साहेब असे म्हणून कार्यालयाचे बाहेर निघून गेले. त्यानंतर मी त्यांना व्हटस् अँप मोबाईल नंबरवर मी पाच तारखेपर्यंत बाहेर जाणार आहे असा संदेश पाठविला, त्यावर लोकसेवक सचिन हिरे यांनी मी घेणार नाही असा व्हटस् अँप संदेश मला पाठविला. त्यामुळे लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्यानंतर दिनांक 02/04/2022 रोजी लोकसेवक सचिन हिरे हे माझेकडे आले व त्यांनी मला सांगीतले की, मला समजले काही तरी प्रब्लेम आहे, मला तुझा मित्र बोंद्रे यांच्या कामाचे पैसे नको, तुझे काही काम असेल तर मला सांग मी करून देईन. त्यानंतर दिनांक 05/04/2022 रोजी पावेतो सचिन हिरे यांनी माझेशी संपर्क केलेला नाही. तसेच यापुढे ते माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत नसल्याने मी दिनांक 05/04/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाकडे सचिन हिरे यांचेविरूध्द योग्य ती कारवाई होणेकामी जबाब लिहून दिलेला होता. एकंदरीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघर यांचे कार्यालयातील लोकसेवक सचिन हिरे, यांनी त्याच्या पदाचा दुरूपयोग करून माझा मित्र यश बोंद्रे यांचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी माझेकडे दिनांक 28/03/2022 रोजी 30,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 25,000/- रू स्विकारण्याचे मान्य केले म्हणून त्यांचेविरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ही फिर्याद लिहून दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vishnu zipru bhoye(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vishnu zipru bhoye
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner